प्रकरण : तीन

# 'सावट' आणि 'चारापाणी' या कादंबऱ्यांतील आशय विशेष

## प्रकरण तिसरे

## 'सावट' आणि 'चारापाणी' या कादंबऱ्यांतील आशय विशेष

**प्रस्तावना :**

यापूर्वीच्या प्रकरणामध्ये रा. रं. बोराडे यांची कादंबरी आणि साहित्य लेखनामागील प्रेरणा व भूमिका पाहिली. तसेच त्यांच्या ग्रामीण आणि दलित साहित्य चळवळविषयक मतांचा मागोवा घेतला. त्यांनी मराठी साहित्याला दिलेले योगदान लक्षात घेतले. प्रस्तुत प्रकरणामध्ये त्यांच्या 'सावट' आणि 'चारापाणी' या कादंबऱ्यांच्या आशयविश्वाचा विचार करावयाचा आहे. तत्पूर्वी या कादंबऱ्यांच्या लेखनामागील प्रेरणांचा प्रथम विचार करून मग आशयविश्वाचा वेध घेता येईल.

**'सावट' आणि 'चारापाणी' या कादंबऱ्यांचे आशयविश्व :**

रा. रं. बोराडे यांच्या 'सावट' आणि 'चारापाणी' या कादंबऱ्यांतील आशयविश्वाचा विचार करता, बोराडे यांनी या कादंबऱ्यांत 'पाचोळा' कादंबरीप्रमाणेच ग्रामीण सामाजिक समस्यांचे प्राधान्याने चित्रण केलेले आढळते. त्याचप्रमाणे रा. रं. बोराडे यांच्या लेखनाला मराठवाड्याची पार्श्वभूमी लाभलेली असल्याने आणि येथील समाजाने निजामी राजवट उपभोगलेली असल्याने या राजवटीचा परिणाम तिथल्या लोकजीवनावर झालेला आहे. तो त्यांच्या कादंबऱ्यातून अभिव्यक्त होतो.

'सावट' ही कादंबरी मानवी जीवनातील नात्यागोत्याचे भावबंध टिपणारी आणि यानिमित्ताने स्त्री-जीवनावरचं घनदाट सावट चित्रित करणारी आहे. तर 'चारापाणी' ही कादंबरी ग्रामीण भागातील पाण्याची व जनावरांच्या चाऱ्याची समस्या घेऊन त्यावर उपाययोजना सांगणारी एक समस्याप्रधान कादंबरी आहे. अशाप्रकारे दोन्ही कादंबऱ्या ग्रामीण जीवनातील सामाजिक समस्यावर प्रकाशझोत टाकणाऱ्या आहेत.

'सावट' या कादंबरीचा आशय पाहण्यापूर्वी या कादंबरी लेखनामागची रा. रं. बोराडे यांची प्रेरणा लक्षात घ्यावी लागेल. बोराडे यांना मुळातच नात्यागोत्याचं आकर्षण आहे. जन्माबरोबर वाढत जाणारी नाती कौटुंबिक धाग्यातून विणली जातात. आणि या धाग्याची गडद वीण आपल्या मोहपाात संपूर्ण मानवी जीवनाला गुरफटून टाकते. याच नात्याची जीवघेणी गुरफट त्यांच्या 'सावट' या कादंबरीला प्रेरणादायी ठरली. त्यातच येथील अडाणी, अज्ञानी माणूस दुष्काळाला तोंड देत असतानाच तेथील एखाद्या सरंजामी राजवट उपभोगलेल्या

वैभवशाली शेतकऱ्याच्या अन्यायाला बळी पडतो. अशा वैभवशाली शेतकऱ्याची सरंजामी, हक्कवादी मूल्यसारणी जपणारी वृत्ती म्हणजेच एकीकडे मानवी भावभावनांना क्षुद्र मानणारी सरंजामी मूल्यधारणा आणि दुसरीकडे नातीगोती जपणारा सहृदय माणूस असा संघर्ष उभा राहतो. त्यातून माणसांचे ढासळणे, त्यामुळे त्यांचे होणारे अधःपतन आणि संस्कृतीमूल्यांची होणारी घसरण यातून 'सावट' ही कादंबरी साकार होते.

'चारापाणी' या कादंबरीचे आशयविश्व लक्षात घेण्याअगोदर या कादंबरीलेखनामागचे प्रयोजन लक्षात घेऊ. प्रथमतः रा. रं. बोराडे यांनी स्वीकारलेली ग्रामीण समाज मनाची बांधिलकी महत्त्वाची होय. तसेच खेड्यातील माणसे प्रामुख्याने शेतीवर जीवन जगणारी आहेत. आणि ही शेती निसर्गाच्या लहरीवर अवलंबून आहे. त्यातच एखाद्या वर्षी पाऊस कमी पडला म्हणजे साहजिकच दुष्काळ पडतो आणि येथील जनजीवन विस्कळीत होते. अशाच १९८५ च्या महाराष्ट्रातील दुष्काळाने जनजीवन होरपळून निघाले. दुष्काळाच्या तीव्रतेने पाण्याचा व जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न निर्माण होतो. माणसं जगविण्यासाठी दुष्काळी कामं व जनावरांसाठी छावण्या या बीजातून बोराडे यांनी प्रथमतः 'होरपळ' ही कथा लिहिली. तीवरून 'चारापाणी' ही कादंबरी लिहिली. या कादंबरीचे प्रेरणास्थान होरपळलेला माणूस होय.

**'सावट' या कादंबरीचा आशय :**

ग्रामीण जीवनात नात्यागोत्यांना अत्यंत महत्त्वाचे स्थान असते. तेथे परस्परांची मने जपण्याचा प्रयत्न ग्रामीण माणूस करीत असतो. इतकेच नव्हे तर ग्रामीण जीवनात वधुपक्षाकडील लोकांची अशी मानसिकता असते की, मुलीच्या सासरकडील लोकांना तर फार जपले पाहिजे. प्रत्येक गोष्टीमध्ये त्यांची मनधरणी केली जाते. त्यांची मने सांभाळताना प्रसंगी त्रासही सहन करावा लागतो. अशा प्रसंगाचं सूक्ष्म अवलोकन करताना लेखक बोराडे यांची संवेदनशीलता जागी होते. त्यांच्यातील कलावंत मन अस्वस्थ होते.

खेड्यातील मुलामुलींची लग्ने शासनाच्या नियमाआधीच म्हणजे १८ वर्षाच्या आत करण्याकडे लोकांचा अधिक कल असतो. ही लग्ने नात्यागोत्यामध्येच जमविली जातात. वर आणि वधू यांच्या पसंती-नापसंतीचा, त्यांच्या मतांचा - मनांचाही कोणी विचार करीत नाहीत, एखाद्या मुलाने अथवा मुलीने विरोध केला तर अनेकांची मने दुखावली जातात. परिणामी त्यांच्यात कौटुंबिक कलहाचं वातावरण निर्माण होतं. असा अंतर्गत ताणतणाव दिवसेंदिवस वाढत जातो. अशावेळी सुनेच्या नात्यातील मुलाने नकार दिला असेल तर तिथे

'सून' या घटकालाच वेठीस धरले जाते कारण तिच्या माहेरच्या लोकांनी यांची सोयरीक स्वीकारलेली नसते. त्याचा सूड ते त्यांच्या मुलीवर म्हणजेच आपल्या घरी नांदत असलेल्या सुनेवर घेतला जातो. तिचा मानसिक, शारीरिक छळ केला जातो. तिला सरळपणे नांदवून घेतले जात नाही. तिचा अनन्वित छळ केला जातो. एवढ्यावरच न थांबता तिला माहेरी पाठवून दिलं जातं. एकूणच तिचं जीवन विस्कळीत केलं जातं. तिचा संसार उध्वस्त केला जातो. त्यामुळे माहेरच्या लोकांची मने मुलीच्या काळजीने व्याकूळ होतात, दुखावली जातात, परिणामी नकार दिलेल्या आपल्याच मुलाविषयी त्यांना तिरस्कार वाटू लागतो. अशाच प्रकारचं चित्रण 'सावट' या कादंबरीमध्ये रा. रं. बोराडे करतात.

मुलीच्या सासरकडची एखादी व्यक्ती आडदांड, हट्टी असली म्हणजे दोन्ही कुटुंबातील संघर्षाला खतपाणीच मिळते. तो सुनेच्या नातलगांना कस्पटासमान मानतो. त्यांच्या भावभावनांना मूठमाती देतो. अशी आडदांड, क्रूर स्वभावाची व्यक्ती आणि अडाणी गरीब, अगतिक बनलेला मुलीचा बाप यांच्यामध्ये संघर्ष सुरू होतो. हाच संघर्ष 'सावट' चा कादंबरीचा मुख्य विषय आहे.

ग्रामीण जीवनात लग्नव्यवस्थेच्या निमित्ताने नात्यागोत्यामध्ये निर्माण झालेल्या ताणतणावांचे चित्रण 'सावट' या कादंबरीचे मुख्य आशयसूत्र आहे. या आशयसुत्रानुसार कादंबरीचे कथानक आकार घेते. येथे माणसांमधील बाह्य संघर्षापेक्षा अंतर्गत, मानसिक संघर्ष रा. रं. बोराडे अधिक प्रमाणात चित्रित करतात.

'सावट' या कादंबरीचा आशय पाहता, त्यामधील नायक दामाजी महाविद्यालयामध्ये बी. एस्सीच्या प्रथम वर्षाला शिकत असलेला दिसतो. त्याची बहीण पमा, तिच्या सासऱ्याच्या भाचीशी दामाजीने लग्न करावे अशी पमाच्या सासऱ्याची जबरदस्त महत्त्वाकांक्षा असते. तो दामाजीच्या आई-वडिलांनाही वारंवार निरोप पाठवितो. दामाजी कॉलेजवर भेटायलाही जातो. जाताजाता दामाजीस, ''आम्ही तुमची बहीण सून म्हणून पत्करली असल्याने तुम्ही आमची भाची बायको म्हणून पत्करावी यातच काय ते समजा'' (पृ. १७) अशी तो धमकीवजा सूचना देतो. त्यामुळं दामाजीचं अभ्यासावरचं लक्ष विचलीत होते. अडाणी मुलीशी लग्न करू नको असा मित्राकडून सल्ला मिळतो. तरीही शिक्षण पूर्ण झाल्याशिवाय लग्न करण्याचा अथवा मुलगी बघण्याचा आपला विचार नसल्याचं तो वडिलांकडून बहिणीच्या सासऱ्यास कळवितो. प्रतिसाद न दिल्यामुळे पमाचा सासरा चिडून पमालाच माहेरी पाठवतो.

पमाला माहेरी पाठविल्याने आई-वडिलही काळजीत पडतात. तसा वडिलांचा दामाजीस शिक्षणासाठी पाठिंबा असतो. दामाजीची अवस्था मात्र कात्रीत सापडल्यासारखी होते. अडाणी मुलीशी लग्न केले तर संसारामध्ये विसंवादी सूर निर्माण होईल. आणि लग्न केले नाही तर बहिणीला जाळभाज होईल. माय आपल्या मुलीच्या काळजीने आप्पा आणि दामाजीस म्हणते, "तुमा दोगांचाबी मला भरोसाच वाटंना झालाय. शिकसेन शिकसेन करताल, आनू माज्या लेकराचं जन्माचं वाटुळं करून बसताल !" (पृ. २९) अशी ती सारखे दोघांवर चिडत राहते. आणि कुटुंबात संघर्षमय वातावरण निर्माण होऊ लागते. त्यामध्ये दिवसेंदिवस वाढच होत जाते. दामाजीचा मावसभाऊ जयवंतराव याच्या मदतीने पमाला सासरी पाठविलं जातं.

दामाजीस पळवून नेऊन लग्न करणार असल्याचं काही दिवसातच जयवंतरावाकडून समजते. तो सावधगिरीने राहत असताना एकेदिवशी पमाच्या सासरचा यशवंता भेटताच दामाजीच्या मनातील भीतीमध्ये वाढ होते. मित्रांकडून यशवंताजवळ, "तुम्ही दामाजीला, पळवायचा प्रयत्न तरी करा नाही तुम्हाला आन तुमच्या त्या पमाच्या सासऱ्याला हातकड्या घातल्या तर मग आम्हाला बोला ! (पृ. ६५) अशी सासऱ्यास धमकी दिली जाते. या धमकीने 'अहंम' दुखावलेला पमाचा सासरा चिडून आपल्या मुलाचं दुसरं लग्न करतो; पमाला सवत आणतो. परिणामी पमाचा संसार उध्वस्त होतो. आई-वडील अश्रू ढाळीत बसतात आणि दामाजीस पश्चाताप करण्याची वेळ येते. अशाप्रकारचा नात्यागोत्यातील ताणतणाव आणि त्यामध्ये एखाद्या आडदांड स्वभावाच्या व्यक्तीमुळे विदीर्ण झालेली अगतिक मने हा 'सावट' या कादंबरीचा आशय आहे. हा आशय विवशतेकडे झुकणारा असून वाचकांना अंतर्मुख करायला लावणारा आहे.

### 'सावट' च्या आशयातील विविधता :

'सावट' या रा. रं. बोराडे यांच्या कादंबरीमध्ये अनेक घटनाप्रसंगातून आशयातील विविधता आढळून येते. नात्यागोत्यातील ताणतणावांबरोबरच ग्रामीण जीवनातील वेगवेगळ्या अंगांना हा आशय स्पर्श करतो. नायक दामाजीचे वडील आप्पा, हे आप्पा दामाजीला जेव्हा भेटायला येतात तेव्हा खोलीपर्यंत रिक्षा अथवा टांगा करीत नाहीत. हमाल बरोबर घेतात परंतु ओझे स्वतः वागवतात तेव्हा दामाजी वडिलांना असं का केलंत म्हणून विचारतो तेव्हा आप्पा म्हणतात, "काय करावं रं बाबा, अगोदरच माजी नजर आधू, त्यातनं पायात पुरतं बळ न्हाई, उगं त्येच्याजवळ पडशी दिली असती आनू तो बघता बघता पळून गेला असता तर काय घ्या ? ...

मला भरोसाच यीना बग त्येचा, आखरीला तुज्या खोलीपसवर सोडायचे पयसे त्याला ठरवून दिले.'' (पृ. २-३)

खरे तर आप्पा अडाणी असले तरी वेडे नक्कीच नाहीत. आपल्या मुलानं शिकावं, मोठे व्हावं म्हणून ते दामाजीला शिक्षणासाठी पाठिंबा देतात. आपल्यासारखं त्यालाही कुळवामागं टाचा घासायला लागू नयेत; ही विचाराची गहनता आप्पांजवळ आहे. शिक्षण झाल्याशिवाय दामाजीच्या लग्नाचा विचार नाही असे आप्पाच पमाच्या सासऱ्यास कळवितात. परंतु नंतर पमाचा विस्कळीत संसार समोर दिसताच ते दामाजीला म्हणतात, ''मंग तवर तुजं लगीन जमवून ठिवलं तर चालंल का?'' (पृ. ३९) शिक्षण पूर्ण होईपर्यंत लग्न जमवून ठेवलं तर पमाचा छळ तरी होणार नाही असं त्यांना वाटते. एकाचा बळी देऊन दुसऱ्यास घडविणं यासाठी कोणतेच आई-वडील तयार होणार नाहीत. मुलीचा बाप म्हणून त्यांचं हे वर्तन योग्य असेच आहे. यामुळे निश्चितच आशयाच्या विविधतेत भर पडते.

दामाजीचे मामा, हेही अडाणी असले तरी त्यांच्याजवळही व्यवहारी शहाणपण आहे. पमाच्या सासऱ्याच्या भाचीशी दामाजीने लग्न केले तर पमा जन्माची सुखी होईल याची मामांना खात्री आहे. ते दामाजीस म्हणतात, ''आता मला आसं सांग दामाजी, मानसाचं तोंड उघडायचं आसलं तर त्येचं नाक दाबावं लागतं का न्हाई'' (पृ. ४१) म्हणजेच त्याची भाची आपल्याकडे आली म्हणजे तिच्या सुखासाठी का हाईना पमाला चांगली वागणूक मिळेल असे व्यवहारीक शहाणपण मामांजवळ आहे. ही गोष्ट निश्चितच 'सावट' च्या आशयामध्ये भर घालते. अडाणी माणूस सर्वच बाबतीत अडाणी असतो असे म्हणता येत नाही, हे येथे लक्षात येते.

एखादा लग्नप्रसंग असेल तरे तेथे बरेच आई-वडील आपल्या मुला-मुलींसाठी योग्य वधू-वर शोधत असतात. हा एक सहज मानवी स्वभावधर्म आहे. आणि तो 'सावट' मध्ये बोराडेही चित्रित करतात. पमाच्या लग्नप्रसंगी तिच्या सासरकडचा एक माणूस दामाजीबद्दल पमाच्या सासऱ्यास म्हणतो, ''आवो, ह्या लग्नासंगंच तुमी ह्येनला आपला भाचे-जावई करून घ्यायला पायजी व्हतं.'' (पृ. ५) आणि लग्नातील याच प्रसंगाला काही कालावधीनंतर मागणीचं स्वरूप येते.

त्याचप्रमाणे वधूपक्षांना लग्न पटकन व्हावे, अशी घाई असते. कारण मध्येच कोणी मोडता घालू नये, शिवाय एक ओझंही खाली व्हावं अशीही मानसिकता असते. लग्न

ठरविल्यानंतर लगेच झालेलं चांगलं, म्हणजे कटकट नाही, असेच कोणत्याही वधूपक्षाला वाटत असते. 'सावट' मध्येही दामाजीच्या लग्नाच्या मागणीसंदर्भात प्रकाश एका मित्राचं उदाहरण सांगतो. या मित्राचं शिक्षण झाल्यानंतर लग्न करण्याच्या अटीवर प्रथम लग्न जमविलं जाते. नंतर मात्र लग्न करून काही दिवस मुलगी माहेरी ठेवून घेऊ असं आमीष दाखवून लग्न उरकलं जातं. पण जेव्हा तो मुलगा सुट्टीनिमित्त घरी येतो तेव्हा तोच त्या मुलीत इतका गुरफटून जातो की परिणामी त्याच्या शिक्षणाचा बट्ट्याबोळ होतो. दुसऱ्याच वर्षी त्याला मुलगी होते आणि तो शिक्षणाला कायमचा रामराम ठोकतो. इथे लक्षात येते ते हे की, लग्नानंतर शिक्षण घेण्यापेक्षा लग्नाआधी निवांतपणे शिक्षण घेणे हे कधीही खूप चांगलं ही जाणीव 'सावट' मधून व्यक्त होते. हा एक आशयविश्वाचा धागा दिसून येतो. दामाजी शिक्षण पूर्ण झाल्याशिवाय लग्नाचा विचार नाही असे सांगतो यामधून बोराडे, आधी शिक्षण महत्त्वाचं ही जाणीव व्यक्त करतात.

शिकलेला नवरा आणि अडाणी बायको असेल तर संसारात विसंवादी सूर निर्माण होईल, हा प्रकाश या पात्राद्वारे व्यक्त झालेला विचारही आशयाची खोली वाढवतो. खेड्यातून पुष्कळ मुले शिकून डॉक्टर, इंजिनिअर, प्राध्यापक, वकील अथवा सरकारी अधिकारी होत आहेत परंतु, "खेड्या-पाड्यातल्या बहुजन समाजातील मुली मात्र खूपच कमी शिकत आहेत. त्यामुळं अनेक विजोडं जोडपी आपल्या समाजात जन्माला येत आहेत. परिणामी विसंवादी सूर निघत रहावेत तसे त्यांचे संसार सुरू आहेत. सोसवतही नाही आणि सांगताही येत नाही अशी त्यांची स्थिती झालेली आहे." (पृ. ३४) हा प्रकाशद्वारे व्यक्त झालेला विचार खूप काही सांगून जातो. यातून मानवी जीवनातील दररोजच्या ज्वलंत प्रश्नांबद्दलचे लेखक भाष्य करीत आहे असे वाटत राहते. आपली बायकोही आपल्यासारखी शिकलेली असावी, असं सुशिक्षित नवऱ्याला वाटणं साहजिक आहे. ह्या गोष्टीमुळे 'सावट' च्या आशयाला व्यापकता येते.

ग्रामीण जीवनात सामाजिक जाणीव ही खूप महत्त्वाची मानली जाते. सामाजिक जाणीव हा ग्रामीण जीवनातील एक संस्कारच असतो. इथे शहरी माणसांसारखी बंद दरवाजाची संस्कृती नसते. गावातील सर्व लोक सुखदुःखाच्या प्रसंगी एकत्र येतात, दोन क्षण का होईना एकमेकांच्या सुखदुःखात सहभागी होतात. 'सावट' मध्ये पमाला माहेरी पाठविली जाते. तसेच तिला सवत आणली जाते. अशा दोन्हीवेळीही दामाजीच्या गावातील संपत हा तरूण

कॉलेजच्या गावी जाऊन त्यास निरोप देतो. हात-पाय गाळून बसलेल्या आप्पा-काकूंचीही तो समजूत घालतो, ''असं करून कसं भागंल आप्पा, आसं हातपाय गाळून बसल्यानं निभावं लागतोय व्हय ? आता दामाजीराव आलेत, समदे निचीतीनं जेवा, समदे मिळून नीट इचार करा, सकाळपसवर मामाबी येतेल, त्यांचा बी इचार घ्या, आप्पा, उठा जल्दी.'' (पृ. ३५) अशाप्रकारचे सामाजिक जाणिवेचे चित्रण 'सावट' च्या आशयाला विविधता आणि व्यापकता देते.

अशी सामाजिक जाणीव आणखी काही प्रसंगी दिसते. पमाला माहेरी पाठविलं जातं तेव्हा माय अंथरूण धरते तर आप्पा गुडघ्यात मान घालून बसतात. तेव्हा त्यांना भेटण्यासाठी गावातील लोकांची रांग लागते ते चित्रण असे, ''पुरूषमाणसं डहाळजत आप्पांजवळ टेकू लागले. काय झालं आणि कसं झालं, यासंबंधी त्यांच्याजवळ विचारणा करू लागले... तिकडं बायका झुंडीझुंडीनं घरात जाऊ लागल्या. आईच्या उशा-पायथ्याशी बसू लागल्या...'' (पृ. ४३) तसेच पमाला निरोप देतानाही गावातील बायका जमा होतात. त्यांच्या विरहात सामील होतात. पमाच्या चुलत सासऱ्याकडूनही या सामाजिक जाणिवेचा प्रत्यय येतो. तो बैलगाडीच्या आडवे होऊन रागाने निघालेल्या पाहुण्यांना थांबवून घेतो. तसेच आपल्या भावाचीही समजूत घालतो. त्यांच्यात वाद निर्माण होऊ नये म्हणून काळजी घेतो. यातून सामाजिक जाणीवेचे दर्शन घडते. ह्या चित्रणामुळे 'सावट'च्या आशयाला विविधता येते.

ग्रामीण जीवनात नात्यागोत्यातील भावबंध जपले जातात. आई-वडील मुलीच्या संसाराची खूप काळजी करतात. दामाजीचे आई-आप्पा पमाच्या सासरच्या लोकांशी जपून राहण्याचा प्रयत्न करतात. किमान मुलगी बघून तरी यावं, देण्याघेण्यात सोयरीक मोडावी असा विचार मांडते, परंतु त्यातील अडचणी आप्पा तिला समजावून सांगतात तेव्हा ती म्हणते, ''तुमचं एक खरं झालं, पर आता माझ्या पमाचं कसं व्हावं ? उद्या तिला तिकडं जाळभाज व्हायली तर तिनं कुणाच्या तोंडाकडं बघावं'' (पृ. २२) यातून लक्षात येते की मुलीच्या आई-वडिलांना मुलीच्या संसाराची किती काळजी असते. दामाजीनं पमाच्या सासऱ्याची अडाणी भाची केली तर पमा कायमची सुखी होईल, असे माय-आप्पांनाही वाटत असते. आधी शिक्षणासाठी पाठीशी असणारे आप्पाही नंतर लग्न जमवून ठेवलं तर चालेल का म्हणून दामाजीस विचारतात. एकदा ते दामाजीस सांगतात, ''... दामाजी एक कर, एखाद्या टायमाला पमाचा सासरा तुला लग्नाचं इचारायला यील, तो तुला लगनाचं इचारायला आला तर त्याला लागंल आसं काय बोलू नगं... आपले केस गुंतलेत त्येंच्या हातात, संबाळून घे जरा'' (पृ. ७)

यामधून मुलीच्या सासरकडील लोकांना जपण्याची प्रवृत्ती येथे दिसते. यामुळेही 'सावट'च्या आशयात विविधता येते.

खलप्रवृत्तीची माणसे ही खूप निर्ढावलेली असतात. याचं चित्रणही बोराडे 'सावट' मध्ये करतात. माणिकरावाचं दुसरं लग्न का केलं ? असं विचारताच, तिला मूल होत नव्हतं असं सासरा धडधडीत खोटं बोलतो. फिर्याद करण्याचं नाव काढल्यावरही तो निर्ढावल्यासारखा बोलतो, ''काय व्हईल ! आमाला हातकड्याच पडत्याल न्हवं ? आमाला जेलातच जावं लागल न्हवं ? करा फिर्याद, टाका आमाला हातकड्या, घाला आमाला जेलमंदी.'' (पृ. ७६) यावरून खलप्रवृत्तीचे लोक किती खालच्या पातळीला जातात हे स्पष्ट होते. त्यामुळे 'सावट'च्या आशयाला विविधता प्राप्त होते.

## 'चारापाणी' या कादंबरीचा आशय :

ग्रामीण जीवनात बहुतांशी लोक शेतकरी असतात. शेती हा तेथे केंद्रबिंदू असतो. तीच तेथील लोकांच्या उदरनिर्वाहाचे साधन असते. परंतू ही शेती निसर्गाच्या लहरीवर अवलंबून असते. सुकाळ असेल तर ग्रामीण माणूस आनंदाने सण-समारंभ साजरे करतो. मात्र दुष्काळ असेल तर संपूर्ण जनजीवन आणि प्राणीजीवन विस्कळीत होते. माणसांपेक्षा प्राणीजीवन अधिक धोक्यात येते.

१९८५ साली महाराष्ट्रात पडलेल्या दुष्काळामुळे प्राणी जीवनाचा प्रश्न निर्माण झाला होता. तेव्हा उद्‌गीर तालुक्यातील शेतकऱ्यांनी 'मेख मारो' आंदोलन पुकारले होते. त्याचा कलात्मकतेने वापर लेखक रावसाहेब रंगराव बोराडे यांनी 'चारापाणी' मध्ये केला आहे. १९८५ च्या दुष्काळाने आणखीच तीव्र रूप धारण केले तेव्हा माणसांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण झाला होता. शेतमजूर - शेतकऱ्यांना जगण्याकरीता सरकारने रोजगार हमीची कामे सुरू केली होती. साखर कारखान्यांनी गुरांच्या छावण्या चालविल्या होत्या. परंतु बैलांच्या छावण्यांचा उपक्रम बीड जिल्ह्यातील आंबाजोगाई येथील 'मानवलोक' या संस्थेने राबविला होता. रात्री बैल छावणीत सोडताना केवळ दहा पैसे भरायचे आणि सकाळी शेतावर कामाला जाताना प्रत्येक बैलजोडीला पाच पेंढ्या कडबा दिला जाई. ही अभिनव छावणीची कल्पना आवडल्याने तशा प्रकारची मागणी केल्याचे चित्रण 'चारापाणी' मध्ये रा. रं. बोराडे करतात.

शेतकरी संघटनेचे एक कार्यकर्ते हे लेखकाचे जवळचे मित्र होते. लेखकाने त्यांना ही 'अभिनव छावण्यांची' कल्पना दिली तेव्हा त्यांनी त्याकडे दुर्लक्ष केले. ते त्यांच्याच व्यापात

पूर्ण मग्न होते. त्यांना आंबाजोगाईच्या परिषदेत ज्वारीच्या भावाची मागणी करायची असते. तसेच चांदवाडच्या महिला मेळाव्यात गुलामांच्या गुलाम असलेल्या शेतकरी महिलांची त्यांना मुक्तता करायची असते. एकीकडे ज्वारीला भाव मागण्याची घाई तर दुसरीकडे दुष्काळपीडितांच्या शेतीत ज्वारीच पिकत नाही हा विरोधाभास लेखक रा. रं. बोराडे 'चारापाणी' मध्ये चित्रित करतात.

आज यंत्रयुगाने मानवी जीवनात प्रवेश केला असला तरी बरीच छोटी कामे बैलांकडूनच करावी लागतात. थोडी शेती असलेला शेतकरी यंत्रापेक्षा बैलाकडूनच शेतीची मशागत करीत असतो. शिवाय विभक्त कुटुंबामुळे जमिनीचे विभाजन होऊ लागलेले आहे. त्यामुळे अल्पभूधारकांची संख्या वाढते आहे. दुष्काळी परिस्थितीत या कोरडवाहू शेतकऱ्यांची खूप वाईट अवस्था बनते. मशागतीचे बैल जगले तरच शेतकरी जगणार असतो. अशा परिस्थितीत चारा महाग होतो. तो विकत घेण्याची या गरीब शेतकऱ्यांची ऐपत नसल्यानं त्यांना बैल विकणं भाग पडतं आणि बैल विकले तर पुन्हा शेतीचा प्रश्न निर्माण होतो. इथे 'दुष्काळामुळे निर्माण झालेली चारापाणी टंचाई आणि त्यावर केलेली उपाययोजना'' हे 'चारापाणी' या कादंबरीचं मुख्य आशयसुत्र आहे. या आशयसुत्राच्या अनुषंगाने विविध घटनाप्रसंगाद्वारे 'चारापाणी' या कादंबरीची रचना रा. रं. बोराडे करतात.

दुष्काळाच्या दाहकतेने होरपळणारा सामान्य माणूस रा. रं. बोराडे यांनी १९८६ च्या दिवाळी अंकात 'होरपळ' या कथेतून चित्रित केला. 'चारापाणी' च्या निर्मितीबाबत रा. रं. बोराडे म्हणतात, ''शेती, पाणी आणि दुष्काळ हा प्रश्न तात्कालिक स्वरूपाचा नाही, तर भारतासारख्या शेतीप्रधान देशाला दीर्घकाळ सतावणारा आहे. वाढत्या लोकसंख्येचे नियोजन, उपलब्ध पाण्याचा काटकसरीनं वापर व आधुनिक शेतीव्यवसायाचं अवलंबन या गोष्टीकडं वेळीच लक्ष दिलं नाही तर या देशाचे भवितव्य धोक्यात येण्याची शक्यता टाळता येणार नाही. या प्रश्नाच्या अनुषंगाने मी विचार करू लागलो. या प्रश्नांची सखोलता व व्यापकता माझ्या मनात विस्तारत गेली. 'होरपळ' ची कथावस्तू माझ्या मनात विस्तारत गेली. 'होरपळ' या दीर्घकथेचं विस्तारीत रूप म्हणजेच ही 'चारापाणी' ही कादंबरी होय''[१] यावरून लक्षात येते की 'चारापाणी' कादंबरी लेखनापूर्वी बोराडे यांनी त्या विषयाचा चांगला अभ्यास, चिंतन केले आहे. यापूर्वीच्या साहित्यामध्ये ग्रामीण जीवनाचा मूलभूत असा असलेला 'बैल' हा घटक काही अंशी चित्रित झाला होता. परंतु रा. रं. बोराडे यांनी बैल या घटकाच्या चारापाण्याची

समस्या 'चारापाणी' या कादंबरीत केंद्रस्थानी ठेवलेली आहे. ग्रामीण साहित्यातील खूप मोठी उणीव या कादंबरीने भरून काढली.[२] असे भीमराव वाघचोरे नमूद करतात.

'चारापाणी' या कादंबरीच्या आशयाचा विचार करता, या कादंबरीमध्ये दुष्काळामुळे जनावरांच्या चारापाण्याची निर्माण झालेली टंचाई आणि त्यावरील उपाययोजना यांचे चित्रण येते. द्विपदवीधर नायक सुखदेवला सुट्टीमध्ये गावच्या दुष्काळाची भयानकता दिसते. अशावेळी प्राणीजीवनाची समस्या एवढी बिकट झालेली असते की, "जिथं चारापाणी मिळेल तिथं जाऊ" (पृ. २) असे म्हणत गाव सोडून निघून जाणारा दत्तू घायवट दिसतो.

रस्त्यामध्ये काही जनावरे मृत्यूमुखी पडलेली दिसतात. घरी गेल्यावर आई 'बाजंवरची' अंघोळ करायला सांगते. ती म्हणते "बाजंवर बसून आंघोळ केली म्हंजी पानी दोन कामासाठी उपेगाला येतं, आपली आंघोळ व्हायची ती व्हती आन् शिवाय तेच पानी धुवायला, सांडायला, लवडायला व्हतं." (पृ. ५) इतकी पाण्याची टंचाई निर्माण झालेली असते याची सुखदेवला जाणीव होते. मौल्यवान वस्तुप्रमाणं पाणी जपून वापरावं लागते. तर जनावरं विकलेली सांगताना वडील म्हणतात, "त्यानला आपल्या दावनीला उपाशी मारण्यापरीस एकदाचं फुकून टाकलेलं बरं ऱ्हाईल म्हणलं, त्याचं जे काय व्हायचं ते निदान डोळ्याच्या म्हागारी तरी हुईल म्हनलं." (पृ. ७) तर बाळबा शेलार म्हणतो, "बैलांच्या गळ्यात दाखले बांधून त्येनला म्या सोडून देतोय, ज्यांची माज्या ह्या बैलांना पोसायची ऐपत आसल त्येंनी ह्यांच्या गळ्यातील दाखले सोडून घेऊन खुशाल ह्या बैलांचं मालकं व्हावं." (पृ. १३) यामधून दुष्काळी परिस्थितीमुळे अगतिक झालेल्या शेतकऱ्यांच्या मानसिकतेचे चित्रण 'चारापाणी' मध्ये रा. रं. बोराडे करतात.

आबारावसारखा गडगंज शेतकरी बाळबाच्या बैलांबरोबर गावातील इतरही शेतकऱ्यांची बैलं संभाळण्यासाठी होतो. शेतेही आबारावास लावतात. ते म्हणतात, "आमीबी त्याच्याकडेच रोजंदारीनं कामाला जानार हाय, रोजगार हमीचं काम करन्यापरीस त्याच्याकडं रोजंदारीनं काम करणं आमच्या फायद्याचं हाय. त्याच्याकडं रोजगारं हमीपेक्षा जास्त रोजगार तर मिळतोच. शिवाय आमचे बैल आमच्या निगरानीखाली ऱ्हातेत आन् शेतंबी आमच्या निगरानीखाली ऱ्हातेत." (पृ. ५८) असा ते समज करून घेतात. त्यांना आपली चूक लक्षातच येत नाही. उसना अथवा कर्जाऊ कडबा सुखदेवने मागितला असता आबाराव त्यास नकार देतो. चाऱ्याची काहीतरी सोय व्हावी म्हणून तो अनेकांना भेटतो. तहसीलदार, गटविकास अधिकारी, साखर कारखान्याचे चेअरमन, शेतकरी संघटनेचे तालुका संघटक अशा विविध

व्यक्तींना भेटतो. तरीही चारा मिळविण्यात त्याला यश येत नाही. मग तो गावातील सर्व शेतकऱ्यांना एकत्र करतो. तो त्यांना सांगतो, "आपल्या कसल्याही मागण्या नाहीत. ज्या काही आहेत त्या मुक्या प्राण्याच्या या बैलांच्या मागण्या आहेत. त्यांच्या मागण्या त्यांनाच मांडायला लावायच्या... त्यांच्या मागण्यांच्या पाट्या लिहून काढायच्या. त्या पाट्या आपल्या बैलांच्या शिंगाम्होरं बांधायच्या" (पृ. ९८) सुखदेवच्या बोलण्यानं प्रभावित झालेले शेतकरी दुसऱ्या दिवशी बैलांबरोबर तालुक्याच्या वाटेला लागतात. इथे शेवटी 'मेखा मारो' आंदोलनाचा वापर रा. रं. बोराडे यांनी कलात्मकतेने केला आहे. असा 'चारापाणी' या कादंबरीचा आशय आहे.

## 'चारापाणी' या कादंबरीच्या आशयातील विविधता :

रा. रं. बोराडे हे सामाजिक प्रश्नांचे भान ठेवून लिहिणारे लेखक आहेत. म्हणूनच 'चारापाणी' सारखी कादंबरी ते लिहू शकतात. या कादंबरीत १९८५ साली महाराष्ट्राला दुष्काळाने बसलेल्या चटक्यांचे चित्रण ते करतात. दुष्काळ हा ग्रामीण जीवनाला एक मोठी आपत्तीच असते. अशावेळी संपूर्ण ग्रामीण जीवनच विस्कळीत बनून जाते. 'चारापाणी' या कादंबरीतील अनेक घटना-प्रसंगातून आशयाची विविधता दिसून येते.

सुखदेव गावचं दुष्काळी रूप पाहतो ते, "... जिकडं नजर टाकावी तिकडं नुसत्याच झळ्या पाण्यावरच्या तरंगाचा आभास निर्माण करणाऱ्या. कुठंतरी एखादं झाड, झाडाच्या आसऱ्यानं उभी असावीत तशी झुडपं." (पृ. १) अशा वर्णनातून ग्रामीण जनजीवनाची वेदनाही चटकन लक्षात येते. हे दुष्काळातील निसर्गाचं चित्रण आशयास विविधता आणते. ह्या दुष्काळामुळे शेतकरी जीवन तर पूर्णपणे धोक्यात येते. जनावरांना चारापाणी मिळणं मुश्कील होतं. "जनावरांना चारा नाही, मानसाला प्यायला पानी नाही, गावात ऱ्हायचं कस ?" (पृ. २) असं म्हणणारा दत्तू घायवट हा शेतकरी गाव सोडून जातो. बाळबा शेलार तर आपल्या बैलांवर जिवापाड प्रेम करणारा शेतकरी, जनावरांना विकणं त्याच्या जिवावर येतं. तो म्हणतो, "कोन इकत घील जनावराच्या बाजारात ह्येनला ? हाय का कुन्या शेतकऱ्याची बैल इकत घ्यायची आयपत ? म्हंजी खाटीकच ह्येनला इकत घील न्हवं ? कोंच्याबी हालतीत म्या माजे ह्ये जित्राबा खाटकाच्या दावनीला बांधनार न्हाई. सोताच्या हातानं म्या ह्येंच्या गळ्यावरनं सुरी फिरविनार न्हाई." (पृ. १३)

खरे हाडाचे शेतकरी आपल्या मुलाप्रमाणं जनावरांवरही प्रेम करतात. ही बाबही

आशयाला समृद्ध करणारी अशी आहे. म्हणून बाळबा शेलार आपल्या बैलांच्या गळ्यात दाखले बांधतो. रंगनाथ फावडे हा पावसाविना वाळून चाललेल्या ऊसाची रात्रंदिवस राखण करतो. कारण चारा कुठेच मिळत नसल्याने कोणी ऊस चोरण्याची अथवा मोकाट जनावरं ऊसात शिरण्याची शक्यता नाकारता येत नसते. गोरख पवार हा शेतकरी आबारावने बैल सांभाळी घेतले म्हणून कुठेतरी थोडासा समाधानी आहे. तो सुखदेवला म्हणतो, "सुखदेवा, आमाला सारं समजतंय रं, आमच्या शेतीच्या मशागतीचं काय व्हईल ते स्पष्ट दिसतंय, पर आमच्या दावनीची ही जित्राबं आमी कशी जगवायची ? खाटीकखान्याकडं धाडायची का आबाराव शेळक्याच्या सांभाळी घालायची ह्ये दोनच आमच्या म्होर सवाल होते. खाटीकखान्याकडं आमचे बैल गेले असते तर आमच्या दावनी मोडल्या असत्या. पुना कवा आमाला बैल, आमचे औत जोडता आले असते का न्हाई हे आमाला सोताला बी सांगता आलं नसतं. बहात्तरच्या दुष्काळात ज्यांचे औत मोडले त्येनला अजून आपले औत उभे करता आलेले नाहीत." (पृ. २९-३०) अशा द्विधा मनःस्थिती झालेल्या शेतकऱ्यांच्या अवस्थेची कल्पना येते. कारण बैल विकले तर पुन्हा घेणंही अशा शेतकऱ्यांना परवडणारं नव्हतं. म्हणून ते नाविलाजाने आबारावाकडे बैलं सांभाळी घालतात.

आबाराव शेळके हा तर शोषकांचा प्रतिनिधीच आहे. मानवी जीवनच असं आहे की मोठ्याने छोट्याचं शोषण करायचं. 'चारापाणी' मध्ये आबाराव शेळकेही अशाच प्रवृत्तीचा वाटतो. तो गावकऱ्यांचे बैल केवळ चारापाण्यावर राबवून घेतो. त्यांची शेतेही स्वतः बटईनं अथवा पैशानं करतो आणि त्याच शेतकऱ्यांना आपले रोजगारी म्हणून कामेही देतो. "आपल्या पिढीजात सावकारीवर गावातल्या शेतकरी - शेतमजूरांचं शोषण करून मिळविलेला पैसा त्यानं विहिरीत ओतला होता. व त्याच्या बळावरच तो जमिनीच्या पोटातलं पाणी वर खेचीत होता." (पृ. २२) माणसाच्या शरीराला एखादा जळू चिपकावा तसा आबाराव शेळके गावाला चिपकला होता. अशी स्वार्थी, केसानं गळा कापणारी माणसं समाजात वावरत असतात. त्यांचे चित्रण आल्याने 'चारापाणी' च्या आशयाचा हाही एक महत्त्वपूर्ण धागा आढळतो.

दुष्काळामुळे पाणी टंचाई निर्माण होते. सुखदेव एका दमात पाण्याचा तांब्या संपवितो तेव्हा आई म्हणते, "लई पानी पिऊ नगंस, आत्तास उन्हातनं आलास." (पृ. ४) असं बोलायला तिला परिस्थिती भाग पाडते. घरात जास्त पाणी नाही हे सांगणं तिला अवघड जातं. सुखदेवला बाजंवर बसून आंघोळ करायला सांगते. "सुखदेवाच्या अंगावरून ओघळलेल्या पाण्याचा

प्रत्येक थेंब नेमका टोपल्यात पडावा म्हणून ती टोपलं इकडं तिकडं करीत राहिली. पाण्याचा प्रत्येक थेंब असा जपला तर पाणी टंचाईची परिस्थिती कशाला उद्‌भवेल बरं ?'' (पृ. ५) या निवेदनातून लेखकाच्या वैचारिकतेला उंची लाभते. त्यांच्यातील चिंतनशील वृत्तीचे दर्शन घडतेच शिवाय 'चारापाणी' च्या आशयाला समृद्‌धताही लाभते.

पिण्याच्या पाण्यासाठीही गावातील लोकांचं खूप हाल होतं. दिवसातून एकच टँकर गावात येत असते. टँकर आलेला समजताच हातातील कामे टाकून सर्व लोक पोहरा आणि घागर घेऊन सार्वजनिक विहिरीकडे धाव घेत. रबरी पाईपद्वारे टँकरमधील पाणी विहिरीत सोडले जाई. एका बाजूने स्त्रिया आणि एका बाजूने पुरूष पाणी भरत. तेव्हाचे चित्रण ''... पाणी शेंदणारांची संख्या इतकी होती आणि पाणी एवढ्या झपाट्याने शेंदलं जात होतं की विहिरीत सोडलेला पोहरा बुडण्याइतपतही विहिरीत पाणी साठू दिलं जात नव्हतं. शिवाय टँकरमधलं पाणी आपटल्यावनी विहिरीत पडत असल्यामुळं ते अतिशय गढूळ होत होतं.'' (पृ. ८) असे गढूळ पाणी खेड्यातील लोक विनातक्रार भरतात मात्र शहरातील लोक अशा पाण्याकडे पाहतील का तरी ? हा प्रश्न लेखकाची चिंतनशीलता सुचवून जातो.

शहरी लोक असे गढूळ पाणी पुरविणाऱ्या यंत्रणेविरूद्ध आवाज उठवतील, मोर्चे काढतील, वृत्तपत्रातून टीका करतील. मात्र खेड्यातील माणसांना दररोजच्या विवंचनातून सवडच मिळत नाही. दैनंदिन गरजांची हातमिळवणी करताकरताच ते अगदी मेटाकुटीला येतात. अथवा अन्यायाविरूद्ध आवाज उठवण्याइतपत ते अजून जागृत झालेले नाहीत. कसंतरी घागर-दीड घागर मिळालेलं पाणी दुसऱ्या दिवसापर्यंत पुरवावं लागे. यातून खेड्यातील माणसाकडे असणाऱ्या सहनशीलतेची कल्पना येते. यामुळे आशयात निश्चितच भर पडते.

वृत्तपत्रीय बातम्यांचा वापर केल्यामुळेही आशयाची विविधता वाढते. रामा सुराशेची बायको गिलासभर पाण्यासाठी तोल जाऊन विहिरीत पडते. तेव्हा सुखदेवला एका लमाणतांड्यावरील प्रसूत बाईची वृत्तपत्रात वाचलेली घटना आठवते. घरातील सर्व माणसं कामाला गेली होती. एक स्त्री दुपारच्या वेळी प्रसूत होते. घरात पाण्याचा थेंबही नसतो. शेजारची एक बाई दूरच्या रानातून पाणी घेऊन येईपर्यंत त्या बाळाचं नैसर्गिक आवरण वाळून ते मूल मरतं. येणाऱ्याजाणाऱ्या प्रत्येक माणसाला 'पाण्याविना माजं बाळ वाळून मेलं रं भाऊ' (पृ. ३४) असे टाहो फोडून सांगत राहते. ही गोष्ट जरी अवास्तव वाटत असली तरी दुष्काळी भागात नैसर्गिक कारणासाठीही पाणी मिळत नाही ही गोष्ट वास्तव आहे. यामुळेच आशयाची,

पर्यायाने पाणीटंचाईची तीव्रता वाढते.

सुखदेवला तहसीलदार ऑफिसमध्ये भेटलेला कुशाबा हा छोटा बागायतदार शेतकरी. या कुशाबाच्या स्वप्नांची राखरांगोळी शासनाच्या नियमांमुळे होते. जिरायती शेतीवर संसार चालविणं कठीण होते म्हणून तो एक धाडस करतो. घरातलं किडूकमिडूक मोडून व उसनंपासनं करून तो विहिर पाडतो. पाणी बऱ्यापैकी लागते. लावलेल्या ऊसाच्या उत्पन्नात मुलीचं लग्न करायचे स्वप्न तो पाहतो. अचानक कोसळलेल्या दुष्काळाच्या आपत्तीमुळे गावात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होते. सरकार कुशाबाची विहीर ताब्यात घेऊन ते पाणी गावाला पुरविते. परंतु नुकसान भरपाई म्हणून त्याला शासनाकडून एक छदामही मिळत नाही. त्याच्या संसाराची होरपळ होते. त्याच्याकडे असलेले पाटबंधारे खात्यातील मंत्र्याच्या गैरवर्तनाविषयीचे कात्रण त्याने मुद्दाम जपून ठेवलेले असते. त्या कात्रणाच्या आधारे कुशाबा भांडणार असतो. नुकसान भरपाई मागणार असतो. म्हणजेचं काय तर, आपलं म्हणणं समोरच्या व्यक्तीला पटवून देताना तोंडच्या शब्दांपेक्षा लेखी पुराव्याला अधिक महत्त्व असते. यामुळेही आशयाच्या विविधतेत वाढ होते.

साखर कारखान्याच्या चेअरमनला भेटायला गेल्यावर सुखदेवला वृत्तपत्रात वाचलेली गुलाबी पेरूच्या बागेसंबंधीची बातमी आठवते. एका शेतकऱ्याने शेताच्या टेकडीवर गुलाबी पेरूंची बाग लावली होती, तिची पाहणी करण्यास पत्रकारांच्या पथकास तो शेतकरी घेऊन येतो. एवढ्या उंच टेकडीवर पाणी कसे आणले याविषयी चौकशी केल्यावर भाबडेपणाचा आव आणीत ही ईश्वरकृपा असल्याचे तो शेतकरी सांगतो. परंतु प्रत्यक्ष पाहणी केली तेव्हा समजते की, "टेकडीवरून काही अंतरावर पाण्याचा पाट वाहात होता. टेकडीच्या खाली विहिर खोदण्यात आली होती व पाटाचा बांध फोडून ते पाणी विहिरीत घेतले जात होते. विहिरीतले ते पाणी विद्युत पंपाने पेरूच्या बागेत लिप्ट केले जात होते." (चारापाणी, पृ. ६४) यावरून समाजातील विषमतेची कल्पना येते. एकीकडे माणसे आणि जनावरे पाण्याविना तडफडत होती. तेव्हाच दुसरीकडे गैरमार्गांनी पाणी मिळवून त्यावर गुलाबी पेरूच्या बागा बहरत होत्या. यावरून लेखकाच्या संवेदनशीलतेची तीव्रता लक्षात येते. हे चित्रण पाणीसमस्येला विरोधाभास निर्माण करणारे आहे. म्हणून आशयाच्या विविधतेत भर पडते.

पत्रकारच प्रलोभनास बळी पडल्याचे वृत्त 'चारापाणी' चा नायक सुखदेव वाचतो. दिल्लीच्या पत्रकारांचं एक पथक दुष्काळी परिस्थितीची पाहणी करण्यासाठी औरंगाबादला

आले होते. त्या पत्रकारांना औरंगाबादच्या उच्चपदस्थ अधिकाऱ्यांनी पंचारांकित हॉटेलमध्ये मोठी पार्टी दिली. यासाठी कोणीच आपल्या खिशातील दिडकीही दिलेली नसते. त्यांनी कदाचित रोजगार हमीच्या लोकांच्या पगारात कपात केली असेल. अशी जंगी पार्टी देण्याची काही गरज नव्हती. ते पत्रकारसुद्धा मद्यपानात बुडून 'मजा आया' म्हणत, येथील भीषण दुष्काळाची तीव्रता लक्षात घेऊन केंद्रसरकारने जादा आर्थिक मदत आपल्या राज्यासाठी मंजूर करावी. अधिकाऱ्यांनी जरी असे केले तरी पत्रकारांनी अशा प्रलोभनास का बळी पडावे ? सुखदेवच्या मनात येते, "अशा प्रकारे बडदास्त न ठेवताही हे पत्रकार या विभागातील दुष्काळाची खरीखुरी वार्तापत्रं लिहितील असं त्यांना पत्रकाराविषयीचा विश्वास का वाटू नये ? ज्यांनी अपप्रवृत्ती उजेडात आणायच्या, ज्यांनी या अपप्रवृत्तीविरूद्ध लोकमत तयार करायचं तेच असे चिखलाने बरबटत राहिले तर इतरांकडून या परिस्थितीत काय अपेक्षा करावी ? (चारापाणी, पृ. ६६) अशावेळी लेखकाला अशा व्यवस्थेविषयीची चीड येते. वृत्तपत्राचे कामच असे आहे की सत्य बातम्या देऊन लोकांचा विश्वास संपादन करणे. हे चित्रण आशयाला विविधता आणणारे ठरते.

नात्यागोत्यांना जपण्याची ग्रामीण लोकांची प्रवृत्ती 'चारापाणी' मध्येही रा. रं. बोराडे चित्रित करतात. आपल्या मुलीच्या संसारात कुठलंही विघ्न येऊ नये असे आई-वडिलांना वाटत असते. दुष्काळाची परिस्थिती सर्वत्र असतानाही सुखदेवचा मेव्हणा जनावरे संभाळण्यासाठी सासरवाडीला पाठवून देतो. याविषयी खरे तर रागच येतो. माघारी धाडायची होती असे सुखदेव आईला म्हणतो तेव्हा आई राहीबाई म्हणते, "वापस कसे धाडता येतेल रं बाबा... गुरं वापस धाडले तर तो आपल्यावर बिघडून बसंल. आपली तेव्हडीबी भीड पडली न्हाई असं त्याला वाटंल तो राग तुज्या भयनीवर काढील. तिची जाळभाज करील." (चारापाणी पृ. ५४) या भितीनं घरात कडब्याची एकही पेंडी नसताना ती जनावरे ठेवून घेतली जातात. गुरं परत धाडली तर ते आपल्या मुलीला परत पाठवतील अशी त्यांना काळजी वाटते. प्रसंगी ते दोन वेळेऐवजी एक वेळ जेवू असे म्हणतात. परंतु जनावरं सांभाळणं महत्त्वाचं असं त्यांना वाटते. यावरून अगतिक आई-वडिलांचे चित्रणही आशयाला विविधता आणते.

शिक्षणामुळे आपणास आपल्या हक्कांची जाणीव होत असते. व्यक्तीच्या मानसिकतेमध्ये शिक्षणामुळेच बदल होत असतो. विचारांना आधुनिकता येते. 'चारापाणी' या कादंबरीतील नायक सुखदेव हा ग्रामीण विद्यार्थी संघटनेचा अध्यक्ष असतो. म्हणूनच

दुष्काळाचा गैरफायदा घेणाऱ्या आबाराव शेळकेला तो सडेतोडपणे बोलतो तो म्हणतो, "मी एक शेतकऱ्याचा मुलगा आहे. तुम्ही नडलेल्या, पिडलेल्या या शेतकऱ्यांचे शोषण करता आहात. तुमच्या विरूद्ध लढण्याचा मला निश्चितच अधिकार आहे." (चारापाणी, पृ. २४) शिक्षणामुळेच सुखदेवला अशा हक्क व अधिकारांची जाणीव होते. म्हणूनच तो राजकीय नेते, सरकारी अधिकारी यांना भेटतो. जनावरांच्या चाऱ्यासाठी छावणीची मागणी करतो. कानाडोळा करणाऱ्यास धारेवर धरतो. प्रसंगी त्यांचे दोष दाखवतो. घरातही आणि बाहेरही तो एकटाच संघर्ष करीत राहतो. शेतकऱ्यांना त्यांचे हित समजावून सांगतो. त्यांना योग्य मार्गदर्शन करण्याचा प्रयत्न करतो. अन्यायाची जाणीव करून देतो. हे सर्व शिक्षणाचे फलीत म्हटल्यास वावगे ठरू नये.

सुखदेवाद्वारे ग्रामीण विद्यार्थी संघटनेच्या हेतू आणि मागणीविषयीचं भाष्य लेखक करतो. ग्रामीण विद्यार्थ्यांवर सतत होणाऱ्या अन्यायविरूद्ध ही संघटना उभारलेली दिसते. मेडिकल, इंजिनिअरींगला ग्रामीण विद्यार्थ्यांपेक्षा शहरी विद्यार्थीच अधिक प्रवेश घेतात या संघटनेचं म्हणणं असं की, "जोपर्यंत तुमी समान संधी आणि समान सुविधा उपलब्ध करून देत नाही तोपर्यंत समान कसोटी लावण्याचा तुम्हाला कसलाही अधिकार नाही. ज्या घरात सुबत्ता आहे, सर्व प्रकारच्या सुविधा आहेत, स्वतंत्र अभ्यासिका आहेत, खासगी शिकविण्या लावण्याची, हवी तेवढी पुस्तकं विकत घेण्याची ऐपत आहे, त्यांनाही तेच निकष आणि ज्या विद्यार्थ्यांच्या जन्मदात्याला अंगठा कुठं आणि कसा करावा हे अजून पुरतेपणी माहित नाही, घरात अभ्यासाचं कसलंही वातावरण नाही, त्यांनाही तेच निकष लावता ?" (चारापाणी, पृ. ५३) ग्रामीण विद्यार्थी संघटना ही ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी शिक्षणामध्ये आणि नोकऱ्यांमध्येही राखीव जागांची मागणी करते. एकूणच काय, तर ग्रामीण विद्यार्थी सतत मागे का राहतो ? याची कारणेही सरकारने शोधून त्यावर उपाय योजना करणं गरजेचं आहे. हा विचार लेखकाच्या चिंतनशीलतेत भर घालतो. परिणामी आशय समृद्ध होताना दिसतो.

'चारापाणी' या कादंबरीत नायक सुखदेव चारा मिळविण्यासाठी शासनाच्या विविध घटकांना भेटतो. परंतु सर्वत्र भ्रष्ट वर्तनाशिवाय दुसरे काहीच त्यास दिसत नाही. अनेक घटना-प्रसंगातून ह्या भ्रष्ट व्यवहाराचे चित्रण रा. रं. बोराडे 'चारापाणी' मध्ये करतात. आज तरी सर्वच क्षेत्रात या भ्रष्टाचारानं आपलं जाळं पसरलेलं आहे. सरकारी अधिकाऱ्यांना तर अशा भ्रष्ट आचाराची सवयच लागून गेलेली असते. 'चारापाणी' मध्ये रामा सुराशे या शेतमजूराची

बायको ग्लासभर पाण्यासाठी तोल जाऊन विहिरीत पडते. त्यावेळी या घटनेचा पंचनामा करण्यासाठी एक पोलिस हेडकॉन्स्टेबल आला होता. तो रामा सुराशेला लुबाडण्याचा प्रयत्न करतो, रामा सुखदेवला म्हणतो, ''तो पाचशे रूपये मागायलाय, न्हाय तर तुजं आन् तुज्या कारभारनीचं भांडण झालं म्हणून तिनं हिरीत उडी टाकून जीव देण्याची कोसीस केली, असा रिपोर्ट करतो म्हनायलाय.'' (चारापाणी, पृ. ३६) यावरून लक्षात येते की हे लोक प्रेताच्या टाळूवरचं लोणी खाण्यास देखील कमी करणार नाहीत. शेतमजूरी करणाऱ्या माणसाची आर्थिक स्थिती ती काय असेल ? परंतु या पोलिस हेडकॉन्स्टेबलला त्याचं काही सोयरसुतक नाही. आपला खिसा गरम झाला म्हणजे काम संपलं. सुखदेव त्यास उपोषणाची धमकी देते परंतु शेवटी त्याने दोनशे रुपये उकळलेच; ते प्रकरण गावच्या पोलीस पाटलाने मिटवलं. यातून, ज्यांनी गावाला संकटातून वाचवायचे, त्यांनी असे लुटण्यासाठी मदत केली तर जाब मागायचा कुणाकडे ? यामुळे आशयाची विविधता वाढतेच शिवाय हा आशय वाचकाला अंतर्मुख बनवितो.

तहसीलदार रावळेसाहेब तर सुखदेवने दिलेल्या चाराटंचाईच्या निवेदनावर वरवर नजर फिरवून लगेच ते निवेदन पेपरवेटखाली ठेवून देतो. यावरून सरकारी अधिकारी आपले काम किती गांभिर्यानं करतात ? याविषयी प्रश्न पडतो. सुखदेव आवाज चढवून बोलतो तेव्हा मात्र सहसीलदार स्वतःला सावरत पुन्हा निवेदनाचा अर्ज हातात घेतो. सुखदेव बी. डी. ओ. साहेबासमोर गावातील पाण्याच्या टंचाईची समस्या मांडतो. टँकरच्या खेपा वाढविणं गरजेचं असल्याचं सांगतो. तेव्हा, ''नवीन टँकर लावायला आम्हाला आता जिल्हाधिकाऱ्यांची परवानगी लागते.'' (चारापाणी, पृ. ४९) असे गटविकास अधिकारी बावणेसाहेब म्हणतात. सुखदेवला आश्चर्य वाटते. ''एखाद्या निर्जीव वस्तूला आग लागली तर ती विझविण्याचे अधिकार अग्निशामक दलाच्या स्थानिक अधिकाऱ्यांना असतात. पण माणसांच्या पोटातील आग विझविण्याचे अधिकार तहसीलदार अथवा गटविकास अधिकारी यांना का नसावेत ?'' (चारापाणी, पृ. ४९) यावरून लक्षात येते की परवानगी मिळेपर्यंत दुष्काळग्रस्त माणसे आणि जनावरे पाण्यावाचून तडफडत राहणार. मग सरकारच्या योजना कधी आल्यातर आल्या. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांकडे शासन तात्काळ लक्ष देत नाही. या वास्तवामुळेच 'चारापाणी' च्या आशयात निश्चितच भर पडते.

नांदेड जिल्ह्याचा रहिवासी माजी पाटबंधारे मंत्री, याने केलेला पाण्याचा गैरवापर, यामुळे निश्चितच 'चारापाणी' चा आशय समृद्ध होतो. अशा लोकांच्या गैरमार्गामुळे सामान्य

गरीब माणूस मात्र धोक्यात येतो. दुष्काळाची तीव्रता जाणवत असताना माणसांच्या पिण्याच्या पाण्याचे हाल सुरू होतात. आणि असे भ्रष्ट मंत्रीमहोदय धरणातील पाण्याचा वापर आपल्या पिकासाठी करतात. मात्र सामान्य जनता पिण्याच्या पाण्यासाठी रानोमाळ फिरत राहते, कुशाबासारख्या सामान्य शेतकऱ्याची सरकार पिळवणूक करते, मात्र त्यास नुकसानभरपाई अजिबात देत नाही. या गोष्टींमुळे पाण्याची तीव्रता अधिक जाणवत राहते. 'चारापाणी' विषयी दिलेल्या अभिप्रायात बोराडे यांना मधू जामकर म्हणतात, "पाण्याचे दुसरे नाव जीवन असे आहे. या अर्थाने तुमची कथा मानवी जीवनाचे रूप रंगविणारी वाटते. पाण्याचे राजकारण, पाण्याची उधळपट्टी, पाण्याची काटकसर आणि डोळ्यातले पाणी हे सारे तुमच्या कथेने अधिक गहिरे केले आहे."[३] या अभिप्रायावरून 'चारापाणी' च्या आशयाची समृद्धता लक्षात येते. दुष्काळ पडला म्हणून बड्या अधिकाऱ्यांना काही हा पाण्याचा तुटवडा भासणार नाही. याची झळ फक्त सामान्य माणसेच सोसतात. परिणामी त्यांच्या डोळ्यात पाणी येते. ही गोष्ट आशयाला व्यापकता आणते.

सत्तेच्या अनेक पदांची लालसा असणाऱ्या माणसांचं चित्रणही रा. रं. बोराडे 'चारापाणी' या कादंबरीत करतात. सत्ता हाती आली की माणसाला आपोआपच पैशाची लालसा वाढते. कोंडाजीराव सातपुते हे साखर कारखान्याचे चेअरमन असतात, त्यांच्याकडून कारखान्याच्या वतीने जनावरांच्या तसेच बैलांच्या छावण्या सुरू करता येतील अशी सुखदेवला आशा वाटते. कारखान्यामुळे गरजूंना रोजगार, सुशिक्षित बेकारांना नोकऱ्या मिळाल्या. पण हे वरवरचं दर्शन म्हणता येईल. कारखान्यामुळं ऊस पिकविणारांच्यात स्पर्धा सुरू झाली. सर्वत्र विहिरी खोदण्याची आणि पाणी खेचण्याची स्पर्धा वाढली. यामुळे छोटे शेतकरी आपोआपच मागे राहतात. बडे बागायतदार आणि अल्पभूधारक यांच्यात दरी निर्माण होते. आवश्यक ते अन्नधान्य पिकविणेही जिरायत शेतकऱ्यांना अवघड झाले.

महाराष्ट्राच्या राजकारणावर बड्या बागायतदारांची पकड अधिक आहे कारण तेच अधिक ऊस उत्पादन करू शकतात, साखर कारखाने त्यांच्याच ऊसउत्पादनावर चालतात. जिरायत शेतकऱ्यांना काही खरेदी करायची म्हटलं की धान्याचं पोतं बाजारात आणावं लागतं. त्यांच्या मालाला चांगला भावही दिला जात नाही. जिरायती शेतकरी दिवसेंदिवस अधिकच गरीब होत चालला आहे. त्यांना बड्या बागायतदारांप्रमाणे जमिनीतले पाणी काढणे अथवा अन्य कोणत्याही मार्गाने पाणी मिळविणे जमणार नव्हते. त्यांच्या जनावरांचा चारापाणी प्रश्न

सुखदेव कोंडोजीराव सातुपतेपुढे मांडतो. परंतु त्यांना प्रश्न ऐकायलाही वेळ नव्हता. ते सध्या इतके बिझी होते की जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या निवडणुकीला त्यांना चेअरमन व्हायचे असते. हे शक्य न झाल्यास राज्य सहकारी बँकेचा प्रतिनिधी म्हणून निवडून यावे अशी इच्छा असते. सुखदेवला ते सध्या सवड नसली तरी आश्वासन देतात की, ''सध्या आम्ही साखर कारखान्याच्या कार्यक्षेत्रातल्या प्रत्येक ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या विहिरीत बोअर घेण्याची एक महत्त्वकांक्षी योजना आखलेली आहे. त्यासाठी आम्ही नुकतीच एक बोअरिंग मशीन खरेदी केलीय, पुढील आठवड्यात आम्ही या योजनेचा शुभारंभ करतोय. ही योजना मार्गी लागली की, आम्ही गुरांची छावणी सुरू करण्याचा विचार करू.'' (चारापाणी, पृ. ७४)

यावरून लक्षात येते की सामान्य जनता दुष्काळाने होरपळत असताना या सत्तेवरील लोकांना त्यांच्या विषयी काहीच आस्था वाटत नाही. कारण त्यांना ऊस उत्पादन अथवा ऊस वाहतुकीसाठी बैलांची गरज नव्हती. सध्या ऊस उत्पादकांचा वाळून चाललेला ऊस वाचविणं महत्त्वाचं होतं. म्हणूनच त्यांना बैलांच्या छावण्या सुरू करण्याची गरज वाटत नाही. यामुळे चारापाण्याच्या टंचाईची तीव्रता जास्तच जाणवत राहते. परिणामी आशयाला बळकटी येते. शेतकरी संघटनेचे तालुका संघटक प्रतापराव कदम हे तर शेतकऱ्यांचे प्रश्न घेऊन लढणारे आहेत. परंतु जनावरांचा चारापाणी प्रश्न सोडवायची त्यांना आजिबात गरज वाटत नाही. छावण्या सुरू करणे हे शेतकरी संघटनेचे कार्य नाही असे सरळसरळ प्रतापराव कदम सुखदेवला सांगतात. सुखदेवला असे बडे अधिकारी पळवाटा शोधणारेच भेटतात. हेही वास्तव जीवनातील एक सत्य आहे. यामुळे आशयाची विविधता वाढतेच शिवाय कादंबरी वाचकांच्या मनात अनेक प्रश्न निर्माण करते. हेच लेखकाचे यश म्हटले पाहिजे.

ग्रामीण जीवनातील सामाजिक जाणीव 'चारापाणी' या कादंबरीतही रा. रं. बोराडे चित्रित करतात. रामा सुराशेचा मुलगा रात्री पाणी पाहिजे म्हणून रडत असतो. रामा सुराशेची बायको कशीबशी मुलाची समजूत घालते व उजाडायच्या वेळी ती गावच्या सार्वजनिक विहिरीत थोडंतरी पाणी मिळेल या आशेने जाते आणि पाणी काढताना तोल जाऊन विहिरीत पडते. तिची जीवघेणी किंकाळी ऐकून संपूर्ण गाव गोळा होतो. सार्वजनिक विहिरीकडे माणसांची रांग लागते. ती बाई कण्हत रडत होती. तिला बराच मुक्कामार लागला होता. गावातील माणसं विहिरीत उतरून तिला बसतं करतात. तिची समजूत घालून तिला धीर देतात. तिच्या नवऱ्याला समजावू लागतात. बादली विहिरीमध्ये सोडून व त्यामध्ये तिला बसवितात व वर

काढतात. सुखदेवही त्यांना पंचनामा करायला आलेल्या पोलिस हेडकॉन्स्टेबल पासून वाचविण्याचा प्रयत्न करतो. यामधून सामाजिक जाणिवेचा प्रत्यय येत राहतो.

आबारावचा कडबा जयराम पेटवितो तेव्हा संपूर्ण गाव मदतीसाठी धावून जाते. त्यावेळचं चित्रण - "... आगीच्या ठिकाणी आलेले सर्व लोक आग विझविण्याचा आटोकाट प्रयत्न करीत होते. काही लोक काठीनं आग थोपटीत होते, तर काही लोक विहिरीतलं पाणी उपसून कडब्याच्या पेटलेल्या गंजीवर टाकीत होत." (चारापाणी, पृ. ८८) इथे लोकांनी धावपळ केली म्हणून निम्मा कडबा तरी हाती लागतो. आबाराव शेळके जयरामला ताब्यात देण्याची अट घालतो. तेव्हा सुखदेव त्याच्या या अटीस विरोध करतो. कारण अशावेळी जयरामच्या जीविताला धोका असण्याची शक्यता नाकारता येत नव्हती. सुखदेव, गावकरी जे कार्य करतात ते सामाजिक जाणिवेमुळेच करतात. यामुळे 'चारापाणी' च्या आशयाला विविधता येते. अशा विविध घटना-प्रसंगातून आशयाची विविधता वाढताना दिसते.

**'सावट' आणि 'चारापाणी' या दोन कादंबऱ्यांच्या आशयातील साम्य आणि वेगळेपण :**

'सावट' आणि 'चारापाणी' या रा. रं. बोराडे यांच्या कादंबऱ्यांचा आशय आणि आशयातील विविधता पाहिली. यानंतर कादंबऱ्यांच्या आशयातील साम्य आणि वेगळेपण यांचा विचार करावयाचा आहे. प्रथम 'सावट' आणि 'चारापाणी' या दोन्ही कादंबऱ्यातील साम्याचा विचार करू.

रा. रं. बोराडे यांच्या 'सावट' आणि 'चारापाणी' या दोन्हीही कादंबऱ्या ग्रामीण जीवनाचे प्रत्ययकारी चित्रण करतात. दोन्हीही कादंबऱ्यांमधून ग्रामीण जीवनातील सामाजिक समस्यांचे चित्रण प्रामुख्याने केलेले दिसते. दोन्हीही कादंबऱ्यांचे नायक हे परिस्थितीने निर्माण झालेल्या सावटामध्ये अडकलेले दिसतात. तसेच नव्याने शिक्षण घेणाऱ्या तरूणांना येणारे नवे भान, त्यांची होणारी मानसिक कुचंबणा व नव्या जगाची नवी आव्हाने स्वीकारावयाची का जुन्यांनाच चिकटून राहायचे यातून त्यांच्या मनता निर्माण झालेले ताणतणाव यांचे चित्रण दोन्ही कादंबऱ्यांतून येते. त्याचबरोबर नात्यागोत्याचे भावबंध जपताना ग्रामीण जीवनातील माणसांची होणारी ओढाताण. सुशिक्षित पिढी व अशिक्षित पिढी यांच्यातील संघर्ष अशा अनेकविध सामाजिक समस्यांचे चित्रण दोन्ही कादंबऱ्यांतून होताना दिसते.

'सावट' आणि 'चारापाणी' मध्ये रा. रं. बोराडे एकेक खलनायकही चित्रित करतात. त्यांच्याशी नायकांना सतत संघर्ष करावा लागला आहे. हे खलनायक सरंजामी वृत्तीचे, श्रीमंत

जमीनदार आहेत. दोन्हीही कादंबऱ्यांतून कमी-जास्त प्रमाणात वर्तमानपत्रातील बातम्यांचा उपयोगही रा. रं. बोराडे करतात. दोनही कादंबऱ्यांतून ग्रामीण जीवनातील सोशिक, सहनशील स्त्री-जीवनाचे दर्शन घडते. अन्याय करणारा आणि अन्याय सहन करणारा असे द्वंद्व दोन्हीही कादंबऱ्यांमध्ये आढळते.

एकूणच दोन्हीही कादंबऱ्यांतून मानवी जीवनातील अनेकविध समस्यांतून निर्माण होणारी घुसमट व्यक्त होते. 'सावट' आणि 'चारापाणी' या दोनही कादंबऱ्या सामान्य माणसांच्या जीवनाचे चित्रण करतात. शेतकऱ्यांच्या जीवनाचे चित्रण दोन्ही कादंबऱ्यांतून येते. कौटुबिंक आणि सामाजिक घुसमट हेच प्रमुख आशयसुत्र रा. रं. बोराडे यांच्या कादंबऱ्यांमध्ये असलेले दिसते. यासंबंधी द. ता. भोसले म्हणतात, "मंदपणे भेगाळून कणाकणांनी ढासळणारी ग्रामीण संस्कृती व समाजरचना पाहण्याशिवाय पर्याय नाही. असा एक उदासवाणा परंतु गंभीर करणारा सूर चारापाणी, सावट आणि पाचोळा यासारख्या कादंबऱ्यांतून प्रकट झालेला आढळतो."[४] एकूणच दोनही कादंबऱ्या ग्रामीण जीवनातील सामान्यांच्या समस्यांचेच चित्रण करतात. अशाप्रकारचे साम्य 'सावट' आणि 'चारापाणी' मध्ये असलेले दिसते. या कादंबऱ्या आकाराने लघुकादंबऱ्या आहेत. दोन्हीही कादंबऱ्यांतून लेखकाच्या ग्रामीण संवेदनशीलतेचा प्रत्यय येत राहतो.

'सावट' ही कादंबरी प्रामुख्याने मानवी जीवनातील नात्यागोत्याचे भावबंध टिपणारी त्यानिमित्ताने स्त्री-जीवनावर निर्माण होणाऱ्या घनदाट सावटाचे चित्रण करण्यावर भर देते. तर 'चारापाणी' ही कादंबरी ग्रामीण जीवनातील दुष्काळामुळे निर्माण झालेल्या पाणी टंचाई व जनावरांच्या चाऱ्याची समस्या घेऊन त्यावर उपाययोजना सुचविणारी एक समस्याप्रधान कादंबरी आहे. हा दोन कादंबऱ्यातील नजरेत येणारा वेगळेपणा असला तरी बोराडे या दोन्ही कादंबऱ्यातून ग्रामीण जीवनातील विविध समस्यांचा वेध घेतात.

अशाप्रकारे 'सावट' आणि 'चारापाणी' या कादंबऱ्यांचे आशयविश्व लक्षात घेता या कादंबऱ्यांतील आशयविश्वासंबंधी दे. शि. दुधलकर यांचे मत लक्षात घ्यावे लागते ते म्हणतात, "आजच्या एकूण मराठी साहित्याच्या दिंडीत ग्रामीण साहित्याची पताका भक्कमपणे पेलणारे बोराडे हे जितके प्रमाणिक तितकेच एकनिष्ठही म्हणावे लागतील"[५] हा दुधलकरांचा बोराडे विषयीचा अभिप्राय रास्त असा आहे. 'सावट' या कादंबरीचा आशय भावविवश करणारा आहे. याविषयी मदन कुलकर्णी म्हणतात, 'सावट' मधून ग्रामजीवनातील एका

महत्त्वपूर्ण प्रश्नाला वाचा फोडली याबद्दलचं श्रेय रा. रं. बोराडे यांना देता येईल. परंतु सरधोपट निवेदनातून हे लेखन आकारास आणण्याच्या प्रयत्नात रचनेची सफाई, वेधकता इत्यादी गोष्टीकडे लेखकाचं पूर्ण दुर्लक्ष झालेलं आहे. 'पाचोळा' काराच्या प्रतिभेवरील 'सावट' वाटंल असं हे लेखन आहे. 'एक फसलेली कादंबरी' (?) या शब्दांनीच 'सावट' चा निर्देश करावा लागेल.''[६] अशा मर्यादा मान्य करूनही कादंबरीमध्ये निर्माण होणाऱ्या भावनात्मक गुंत्यामुळे ती वाचकांना अंतर्मुख करते. परिणामी कादंबरीला एक प्रकारची कलात्मक उंची लाभते.

'चारापाणी' ह्या रा. रं. बोराडे यांच्या कादंबरीलाही काही मर्यादा पडतात. हेच दुष्काळाचे चित्रण आणखी दाहकतेने चित्रित करता आले असते. चारापाण्याविना तडफडणारी जनावरे दिसत नाहीत. अथवा अन्नपाण्याविना माणसं तळमळताना दिसत नाहीत. अगदीच हे चित्रण थेट वाचकांच्या मनाला स्पर्श करीत नाही. कधीकधी एकसुरीपणा जाणवत राहतो. लेखकाला कादंबरीचा पटही मोठा करता आलेला नाही. या कादंबरीविषयी दादा गोरे म्हणतात, ''खरं तर ग्रामीण जीवनात 'दुष्काळ' हीच मुळात भयानक समस्या आहे. ही समस्या बोराडे यांनी कादंबरीतून मांडण्याचा प्रयोग केला आहे. हा प्रयोग कादंबरीत यशस्वी की अयशस्वी झाला या प्रश्नाला अर्थ नाही. बोराडे यांनी 'चारापाणी' ही समस्या मांडण्याचा जो प्रयोग मराठी कादंबरीत केला तो कौतुकास्पद आहे. एका वेगळ्या अर्थाने चारापाणी मराठी ग्रामीण कादंबरीतील प्रयोगशील कादंबरी आहे असे मला वाटते.''[७] हे दादा गोरे यांचे मत योग्य असेच आहे. कारण बोराडे यांच्या कादंबऱ्या ग्रामीण जीवनातील वास्तवाचं, बदलत्या प्रश्नांचं चित्रण करतात. लेखकाची या ग्रामीण जीवनाविषयीची एकनिष्ठता निश्चितच कौतुकास्पद आहे. अशाप्रकारे कादंबऱ्यांच्या आशयावरून बोराडे यांच्या कादंबरी लेखनामागची प्रेरणा मानवी मनातील विविध पैलू आणि त्या पैलूंचे व्यापक असे संघर्षशील रूप आहे. केवळ आत्मविष्कार हीच प्रेरणा असलेली दिसते.

**सारांश :**

प्रस्तुत प्रकरणामध्ये रा. रं. बोराडे यांच्या 'सावट' आणि 'चारापाणी' या कादंबऱ्यांचे आशयविश्व विचारात घेतले. 'सावट' आणि 'चारापाणी' या कादंबऱ्यातील आशयविश्व, त्यातील साम्य व विविधता याचा विचार करता बोराडे या दोन्ही कादंबऱ्यातून ग्रामीण जीवनातील सामाजिक समस्यांचे प्रामुख्याने चित्रण करण्यात ते बहुतांशी यशस्वी झालेले दिसतात. ग्रामीण जीवनातील सामाजिक समस्यांचे चित्रण करीत असताना तेथील बदलत्या वास्तवाचाही ते वेध घेताना दिसतात. तसेच ग्रामीण जीवनात नात्यागोत्याचे भावबंध जपताना निर्माण होणाऱ्या समस्या आणि त्यातून पात्रांचा होणारा कोंडमारा, त्यांच्यात निर्माण होणारे

ताणतणाव, विशेषतः विवाह प्रसंगांच्या निमित्ताने नात्यागोत्यात निर्माण होणारे अंतर्गत ताणतणाव यांचेही चित्रण या कादंबऱ्यातून येते.

तसेच नव्याने शिक्षण घेणाऱ्या तरूण पिढीच्या मनात निर्माण होणारे ताणतणाव व सुशिक्षित पिढी आणि जुनी पिढी यांच्यात निर्माण होणारी विचाराची दरी याचेही चित्रण या कादंबऱ्यांतून येते. तसेच अधिकारी, पुढारी, राजकारणी मंडळी ग्रामीण जीवनातील सामाजिक समस्या न संपविता नव्या समस्यांची निर्मिती कशी करतात याचेही चित्रण या कादंबऱ्यातून येते. ग्रामीण जीवनातील सुशिक्षित तरूणांना आज ग्रामीण भागात शासन, अधिकारी, न्यायव्यवस्था, राजकारणी, पुढारी यांच्यापासून आपल्या घरातील माणसांची झालेली फसवणूक यातून सुटका करून घेण्यासाठी कशाप्रकारे संघर्ष करावा लागतो आहे याचेही चित्रण या कादंबऱ्यातून येते. अशा अनेकविध सामाजिक समस्यांना रा. रं. बोराडे यांनी आपल्या कादंबऱ्यांच्या आशयविश्वात सामावून घेतलेले दिसून येते.

अशाप्रकारे 'सावट' या कादंबरीचा आशय नातीगोती, त्यातील भावसंबंध आणि त्यातून निर्माण होणारे स्त्रीजीवनावरील घनदाट सावट, त्यांचा होणारा भावनिक व मानसिक कोंडमारा आणि नातीगोती जपताना त्यांची होणारी ओढाताण, नात्यागोत्याचे भावबंध जपताना तरूण पिढीची होणारी शोकांतिका इ. नी युक्त असा आहे. तर 'चारापाणी' मध्ये दुष्काळामुळे निर्माण झालेला पाणी टंचाईचा प्रश्न व जनावरांच्या चारापाण्याचा प्रश्न आणि या प्रश्नांच्या उपाययोजनासाठी ग्रामीण भागातील लोकांना करावा लागणारा संघर्ष. एका बाजूने निसर्गातील दुष्काळामुळे ग्रामीण लोकांची होणारी कुतरओढ आणि त्यातही बड्या शेतीवाल्याकडून होणारे शोषण कशाप्रकारचे असते हे 'चारापाणी' मधील आशयातून व्यक्त होते.

याचबरोबर बोराडे यांच्या कादंबरीलेखनाला ग्रामीण परिवेश लाभल्याने तेथील स्त्रीचे शोषण करणारी संस्कृती यांचेही प्रभावी चित्रण त्यांच्या या कादंबऱ्यांतून होताना दिसते. म्हणूनच बोराडे यांच्या कादंबऱ्यातील आशयविश्वातून ग्रामीण जीवनातील सामाजिक आशय जसा अभिव्यक्त होतो तसा ग्रामीण वास्तव; त्यातील समस्या; त्यावरील उपायोजना यांही प्रत्ययास येतात. त्यामुळे ग्रामीण सामाजिक वास्तव, त्यातील प्रश्न, त्यावरील उपाय याचे चित्रण करून बोराडे यांनी कादंबरी लेखनात केलेला एक आगळा वेगळा प्रयोग दिसून येतो.

अशाप्रकारे 'सावट' आणि 'चारापाणी' या रा. रं. बोराडे यांच्या कादंबऱ्यातील आशयविश्वाचा विचार करता या दोन्ही कादंबऱ्यातील आशय वाचकास अंतर्मुख बनविणारा असाच आहे. यानंतर पुढील प्रकरणात या दोन्ही कादंबऱ्यांच्या अभिव्यक्ती विशेषांचा व अन्यविशेषांचा विचार केलेला आहे.

## संदर्भ टीपा


| | | |
|---|---|---|
| १) रा. रं. बोराडे | 'चारापाणी' - प्रस्तावना | |
| २) भीमराव वाघचौरे | 'रा. रं. बोराडे यांचे साहित्य : स्वरूप आणि आस्वाद' पृ. १७६ | |
| ३) मधू जामकर | 'घरशिवार' (सं. चंद्रकुमार नलगे) पृ. १३० | |
| ४) द. ता. भोसले | 'घरशिवार' | पृ. ११७ |
| ५) दे. शि. दुधलकर | 'दै. लोकमत' २२ मे १९८८ | |
| ६) मदन कुलकर्णी | 'तरूण भारत - नागपूर' | |
| ७) दादा गोरे | 'साहित्य : समीक्षा आणि आस्वाद' | पृ. ४१ |